**जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,**
**ठाणे शहर**

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक १४.१२.२०२४**

## ''सन २०१८ मध्ये झालेल्या खुनाच्या गुन्हयातील आरोपीस जन्मठेप''

सन २०१८ मध्ये आरोपी आकाशकुमार पवार, वय २५ याने कु. प्राची विकास झाडे, वय २१ वर्षे हिचेवर शुल्लक कारणावरुन धारदार शस्त्राने वार करुन तिस जिवे ठार मारले होते. त्यावरुन सदर आरोपी याचेविरुध्द नौपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I २४१/२०१८, भा.द.वि. कलम ३०२,३४१ भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाच्या तपासात तत्कालीन तपासी अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक/श्री.चंद्रकांत जाधव, पोलीस निरीक्षक/श्री.अविनाश सोंडकर व त्यांचे पथकाने भक्कम पुरावे गोळा करुन आरोपी विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते.

सदर गुन्हयाची सुनावणी मा.श्री.अग्रवाल साहेब, जिल्हा व सत्र न्यायाधिश, ठाणे यांनी घेवुन खुनाच्या गुन्हयातील आरोपी आकाशकुमार पवार यास सीआरपीसी २३५(२) सह भा.द.वि. कलम ३०२,३४१ भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५ प्रमाणे प्रमाणे दोषी ठरवुन जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

सदर खुनाच्या गुन्हयाच्या संदर्भात सरकारच्या वतीने सरकारी अभियोक्ता श्री.लाडवांजरी साहेब, तत्कालीन तपासी अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक/श्री.चंद्रकांत जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक/श्री.अभय महाजन, पोलीस निरीक्षक/श्री.अविनाश सोंडकर, पोहवा/६९२३ लोहार, पोहवा/११९२ राठोड, पोहवा/म्हापुणकर, पोहवा/वीर, पोहवा/१६८९ गोगावले, पोशि/७३५८ सिंग सर्व नेमणुक नौपाडा पोलीस ठाणे यांनी अथक परिश्रम करुन मा.न्यायालयात ठोस पुरावे सादर केले व त्यामुळे उपरोक्त गुन्हयातील आरोपीला दोषी ठरविण्यात यश आल्यामुळे सदर उत्कृष्ठ कामगिरीबाबत पोलीस दलात व समाजातील सर्व स्तरातुन पोलीसांचे कौतुक होत आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर